UFO digital cinema

Publication: Maharashtra Times
Date: 06/03/2019

महाराष्ट्र टाइम्स

# 'पायरसी'शी दोन हात

**चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वीच किंवा झाल्यावर लगेचच तो ऑनलाइन दिसणं यामुळे सिनेमावाले त्रस्त आहेत. पायरसी ही सिनेसृष्टीसाठी मोठी डोकेदुखी आहे. पायरसीमुळे कोट्यवधींचं नुकसान सहन करावं लागत असल्यामुळे ती रोखण्यासाठी कडक पावलं उचलण्यात येत आहेत. पायरसीविरोधी कायद्यामध्ये सुधारणा करण्यात आल्या असून त्यामुळे तरी पायरसीला आळा बसेल, अशी अपेक्षा व्यक्त होतेय, त्याविषयी...**


द ॲक्सिडेंटल प्राइम मिनिस्टर


ठाकरे

» पुणे टाइम्स टीम

सिनेसृष्टीसाठी पायरसी एक मोठी डोकेदुखी ठरतेय. पायरसीमुळे करोडोंचं नुकसान मनोरंजनसृष्टीला सहन करावं लागतंय. म्हणूनच, सिनेमॅटोग्राफी कायदा १९५२ मध्ये काही बदल करून चित्रपटगृहात सिनेमांचं रेकॉर्डिंग करण्याबाबत कडक पावलं उचलण्यात येतं आहेत. जेणेकरून पायरसी रोखता येईल. सरकारच्या या निर्णयामुळे निर्मात्यांनी सुटकेचा निश्वास सोडलेला असला, तरी दर आठवड्याला पायरसीच्या घटना डोकं वर काढतं आहेत.

पायरसी नेहमीच सिनेसृष्टीचा सर्वांत मोठा शत्रू ठरली आहे. एका अहवालानुसार, पायरसीमुळे भारतीय चित्रपट उद्योगाला दरवर्षी २.७ बिलियन डॉलर्सचा तोटा (सुमारे दोन अब्ज डॉलर्स) सहन करावा लागतो. या सगळ्याकडे गांभीर्यानं लक्ष वेधलं ते 'मांझी द माउंटनमॅन', 'मोहल्ला अस्सी', 'उडता पंजाब' आणि 'ग्रेट ग्रँड मस्ती' या चित्रपटांनी. कारण, हे चित्रपट चित्रपटगृहांपार्यंत पोहोचण्यापूर्वीच लीक झाले होते. गेलं वर्षभर पायरसीबाबत कडक कारवाई होण्याबाबत सिनेविश्व आग्रही झालं होतं. त्याचे फलित म्हणून अलीकडे संसदेनं 'सिनेमेटोग्राफी कायदा १९५२' मध्ये बदल मंजूर केले. त्यात, 'थिएटरमध्ये चित्रपट चित्रीत करणं आणि इंटरनेटवर टाकणं हे कायद्याचे उल्लंघन आहे, असं करणाऱ्यांना दहा लाख रुपये दंड किंवा तीन वर्षांपर्यंतचा तुरुंगवास होण्याची शक्यता आहे.



पायरसीपासून बचाव करण्यासाठी बॉलिवूड 'एथिकल हॅकिंग'चा पर्यायही अवलंबत असल्याचं कळतंय. यात काही बड्या कंपन्यांनाही निर्मात्यांसाठी 'अँटी पायरसी सर्व्हिस' उपलब्ध करून दिली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, यात निर्मात्यांना चित्रपटाचे डिजिटल माहितीहक्क 'अँटी पायरसी सर्व्हिस' पुरवणाऱ्या कांपनीला द्यावे लागतात. त्यांनतर तो चित्रपट प्रदार्शित होईपर्यंत २४ तास सिनेमांचं 'डिजिटल मॉनरिंग' होतं. या दरम्यान इंटरनेटवर चित्रपटासंबंधी कोणतीही आक्षेपार्ह लिंक अपलोड होताच, अँटी पायरसीच्या मदतीनं ती त्वरित काढून टाकण्यात येते. 'नमस्ते इंग्लंड', 'द ॲक्सिडेंटल प्राइम मिनिस्टर' या चित्रपटांसाठी अशा सर्व्हिसचा वापर करण्यात आला होता. असं असूनही, चित्रपटगृहातून होणाऱ्या पायरसीबाबत कडक नियम करावेत, या मागणीनं जोर धरला आहे.

## वॉटरमार्क रोखणार पायरसी

डिजिटल चित्रपट वितरण कंपनी युएफओ मूव्हीजच्या म्हणण्यानुसार, सरकारच्या निर्णयामुळे पायरसी करणाऱ्यांच्या विरोधात कडक कारवाई होईल. जेणेकरून निश्चितच पायरसी कमी होईल आणि उद्योगाचं नुकसान होणार नाही. कंपनीचे सीओओ पंकज जयसिंह म्हणाले, 'सध्या चित्रपटगृहातच चित्रपटांचं रेकॉर्डिंग करून पायरसी होण्याचं प्रमाण वाढलं आहे. हे रोखण्यासाठी आम्ही युनिक वॉटरमार्किंग तंत्रज्ञान विकसित केलं आहे. हे अदृश्य वॉटरमार्किंग प्रत्येक डिजिटल प्रिंटवर असतं, जे प्रत्येक चित्रपटगृहासाठी वेगळं आहे. यावरून हे ओळखलं जाऊ शकतं, की रेकॉर्डिंग कोणत्या चित्रपटगृहात झाले आहे. ज्यामुळे पायरसीचे मूळ केंद्र शोधण्यास मदत होईल.'

## तरीही झाली पायरसी

गेल्या दोन महिन्यांमध्ये प्रदर्शित झालेल्या चित्रपटांमध्ये बॉक्स ऑफिसवर चांगल्या चाललेल्या सिनेमांची पायरसी झाल्याचं चित्र आहे. 'मनकर्णिका : द क्वीन ऑफ झांसी', 'उरी : द सर्जिकल स्ट्राइक' या चित्रपटांसह 'टोटल धमाल' आणि 'लुकाछुपी' या नुकत्याच प्रदर्शित झालेल्या चित्रपटांची पायरेटेड कॉपी व्हायरल झाली आहे. त्यामुळे यापुढे पायरसीचा नियम अधिक कडक व्हावा, अशी सर्वांची अपेक्षा आहे.

**“ दोन वर्षांपूर्वीच पायरेटेड सीडींचा जमाना कालबाह्य झाला आहे; पण चित्रपट प्रदर्शित झाल्यावर लगेचच त्याची पायरसी होऊन इंटरनेटवर कोणत्या ना कोणत्या वेबसाइटवर ती उपलब्ध होते. ती थांबवणं खूप कठीण आहे. युनिक वॉटरमार्किंग तंत्रज्ञानाच्या साहाय्यानं पायरसी झालेल्या चित्रपटगृहाचा शोध घेता येईल, पण अनेकदा चित्रपटगृहातले कर्मचारीच यात सामील असतात.**

**- नानूभाई जयसिंघानी, सिनेनिर्माते**